Vol III Issue X April 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3 | Issue-10 | April-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# महात्मा जोतिराव फुले यांचे वाङ्‌मयीन कार्य

रविराज नामदेव कांबळे

सहाय्यक प्राध्यापक (इतिहास विभाग) कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर.

**सारांश :-** महात्मा फुले यांच्या वाङःमयाने मराठी भाषेला आणि भाषा शैलीला महत्वाचे योगदान दिले आहे. त्यांचे लिखाण हे सोप्या मराठमोळया भाषेत अभिनव समाज क्रांतिकारक विचारांची मांडणी करणारे आहे. महात्मा फुले यांनी मराठी भाषा आणि वाङःमयाला देशीपणाचे भान दिले. साहित्याच्या व्यासपीठावर लोकभाषेला, बोलीभाषेला प्रतिष्ठा दिली. आपल्याला जे जाणवेल, भावेल, रुचेल ते मनःपूर्वक लिहावे ते कोणत्या वाङःमय प्रकारात समाविष्ट होईल, कोणत्या आवृत्तीत बसेल याचा विचार त्यांनी केला नाही. प्रचलीत वर्णवर्चस्ववादी साहित्याचे मानदंड नाकारुन महात्मा फुले यांनी लेखन केले आहे.

त्यांचे लिखाण शूद्रादि, अतिशूद्र व स्त्रिया शेतकरी व कष्टकरी या वर्गास सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त करणारे त्यांच्या हक्कांची जाणीव देणारे व माणसाला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार देणारे आहे. शूद्रातिशूद्र, स्त्रिया, शेतकरी व कष्टकरी या वर्गाच्या जागृतीसाठी व त्यांच्या उध्दारासाठी महात्मा जोतिराव फुले यांच्या लेखानाचा आटापिटा होता. तसेच समाजातील पिचल्या गेलेल्या सर्व वर्गाची दुःखे वेशीवर टांगण्यासाठी त्यांच्या लिखाणाचा प्रयत्न होता. त्यांचे लिखाण पद्दलितांनी न्यायासाठी केलेला आक्रोश होता. जोतिरावांचे लिखाण जरी ओबड–धोबड बोली व रांगडया भाषेतील असले तरी समाजातील पद्दलित समाजाला जागृत करणारे त्यांचा उध्दार करणारे व त्यांच्यात हक्काची जाणीव करणारे आहे.

## प्रस्तावना :

भारत मातेने आपल्या हजारो वर्षाच्या इतिहासात आपल्या कुशीतून अनेक थोर पुरुषांना जन्म दिलेला आहे. यातील सर्वश्रेष्ठ महापुरुष म्हणजे जोतिराव फुले हे होत. उक्ती आणि कृती यामध्ये कमालीचे साम्य असलेला महामानव म्हणजे जोतिराव फुले होत. महाराष्ट्राच्या समाजसेवेसाठी ध्येयाने भारावून जाऊन आपले सर्व जीवन अर्पण करणारे ते पहिले थोर पुरुष होते. ते नुसते बोल घेवडे सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे ते ऋषि होते.

शालेय शिक्षणाच्या काळातच जोतिरावांनी छत्रपती शिवराय आणि जॉर्ज वॉशिंग्टन इत्यादी थोर व्यक्तींची चरित्रे अभ्यासली होती. या दोघांची वीरवृत्ती, स्वदेशप्रेम, उदात्त महत्वाकांक्षा यापासून त्यांनी स्फूर्ती घेतली. बहुजन समाजाचे हिन्दवी स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवराय जोतिरावांचे प्रेरणास्थान बनले. पुढे त्यांच्या विचारांवर पाश्चिमात्य तत्वज्ञ व विचारवंत थॉमस पेन या बंडखोर साहित्यिकांच्या 'राईटस ऑफ मॅन' ग्रंथाने त्यांच्या मनावर अतिशय परिणाम घडवून आणला आणि ते साहित्यिक बनले.

बहुजनसमाजाचे प्रबोधन व दलितमुक्तीचा प्रचार हे जोतिरावांच्या चळवळीचे एक प्रमुख अंग होते. बहुजन समाजाच्या जागृतीसाठी व अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी जोतिरावांनी अनेक ग्रंथ (पुस्तके) लिहिले आहेत. त्यांचे सर्व लेखन सत्यशोधक समाजाशी निगडीत आहे. शेतकरी, कष्टकरी, शूद्र समाज, श्रमजीवी वर्ग हाच त्यांच्या विचारांचा व कार्याचा केंद्रबिंदू होता त्यांची दुःखे गा–हाणी वेशीवर टांगण्यासाठीच त्यांनी आपल्या हातात लेखणी घेतली होती.[1]

## जोतिरावांची ग्रंथ संपदा

1.तृतीय रत्न (नाटक) पुणे 1855
2.जातीभेद विवेकसार–आवृत्ती–2 री, एक हिन्दू(तपुकाराम तात्या पडवळ) प्रकाशक– जोती गोविंदराव फुले, पुणे 1865
3.छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा, मुंबई, 1869
4.ब्राम्हणांचे कसब, मुंबई 1869
5.गुलामगिरी पुणे 1873

6.शेतक—यांचा आसूड पुणे 1885
7.सत्सार अंक 1 व 2 पुणे 1885
8.इशारा पुणे 1885
9.सत्यशोधक समाजोक्त मंगलापटकांसह सर्व पूजा विधी 1887
10.सार्वजनिक सत्यधर्म मुंबई 1891
11.अखंडादि काव्यरचना (स्फुट) पुणे2

समाजाला शहाणे करणे शास्त्रीय वृत्तीचा स्वीकार करणे, स्वातंत्र्य मिळविणे, त्यासाठी संघर्ष करणे प्रत्येकाने नीतीने व सत्याने आचरण करणे या विचार – प्रचाराच्या प्रेरणेने महात्मा फुले यांचे साहित्य निर्माण झाले.[3]

*तृतीय रत्न :–*

भट जोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रास कसकसे फसवून खातात व खिस्ती उपदेशक आपल्या निःपक्षपाती धर्माच्या आधाराने अज्ञानी शूद्रास खरे ज्ञान सांगून त्यास कसकसे सत्यमार्गावर आणितात हे दाखवून त्यांचे मर्म लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी जोतिरावांनी इ.स.1855 मध्ये 'तृतीयरत्न' हे नाटक लिहिले. या नाटकाचे कथानक अगदी साधे आहे. तयातील प्रसंगही मोजकेच आहेत. कुणबी स्त्री, तिचा नवरा, जोशी, त्याची पत्नी, विदूषक जोश्याचा भाऊ दामू पाद्री, एक मुसलमान इतकी पात्रे आहेत. ब्राम्हणी धर्मव्यवस्थेने देवधर्माच्या नावाने ज्या खुळया समजूती समाजात पसरविल्या होत्या त्या त्यांनी नाटकात उघडकीस आणून जनतेला अनमोल संदेश दिला आहे. कुणबी शेतमजुरांच्या वेदनांवर, शोषणांवर प्रकाश टाकणारे 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहिणारे महात्मा फुले हे भारतातील आद्य आधुनिक नाटककार आहेत.[4]

*छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा :–*

छत्रपती शिवारायांचे कर्तृत्व व पराक्रम आणि थोरवी यांच्याकडे लक्ष वेधण्यासाठी जोतिरावांनी जून 1869 मध्ये 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा' रचला. अर्वाचीन मराठी साहित्यात शिवछत्रपतींचे पराक्रम व कर्तृत्व यांकडे प्रथम लोकांचे लक्ष वेधण्याचे श्रेय जोतिरावांच्या पोवाडयास आहे. या पोवाडयाचे आठ भाग केलेले असून 924 पंक्तीचा असून एकूण 45 पानांचा आहे. पोवाडयाची सुरुवातच त्यांनी 'कुळवाडीभूषण पवाडा गातो भोसल्यांचा छत्रपती शिवाजीचा' अशी केली आहे. जगातील पहिले मराठी चरित्र शिवरायांवर एक हजार ओव्यांचा पोवाडा लिहून लोकांपुढे आणला. महात्मा जोतिराव फुले यांच्यामुळेच संपूर्ण जगाला छत्रपती शिवराय माहित झाले.[5]

*ब्राम्हणांचे कसब :–*

जोतिरावांनी 'ब्राम्हणांचे कसब' या नावाचा एक काव्यसंग्रह इ.स.1869 मध्ये लिहिला. या काव्य संग्रहात धर्माचे नावाखाली चतुर ब्राम्हण अज्ञानी व अक्षरशून्य शूद्रांची कशी फसवणूक करतात याचा चांगलाच उहापोह केलेला आहे.[6] हा ग्रंथ त्यांनी महाराष्ट्र देशातील कुणबी, माळी, मांग, महार यांना परम प्रितीने नजर केल आहे यात त्यांनी भटजोशी अडाणी व गरीब शूद्राला धर्माच्या नावाखाली भूलथापा देऊन कसे राजरोस लुबाडतात ते दाखवून दिले आहे.[7] जोतिराव शोषितांचे कैवारी असल्यामुळे त्यांनी समाजाला जागृत करण्यासाठी हा ग्रंथ लिहिला. भटांचा 'बामणी कावा' सामान्य जनतेला कळावा म्हणून त्यांनी या ग्रंथाची रचना केली आहे.

*गुलामगिरी :–*

जोतिरावांचा गुलामगिरी हा ग्रंथ इ.स.1873 मध्ये प्रसिध्द झाला. गुलामगिरी मग ती आर्थिक, धार्मिक व सामाजिक असो किंवा ती कोणत्याही स्वरुपाची असो तिच्याबद्दल महात्मा जोतिराव यांच्या मनात अत्यंत तिटकरा होता गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्यासाठी अमेरिकेत जे यादवी युध्द झाले त्याचे महत्व त्यांना मनोमन पटले. अमेरिकेतल्या निग्रो गुलामाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या लोकांनी व वीरांनी अविरत झगडा केला. आपले जीवाचे रान केले. त्या सर्वांची जोतिरावांनी स्तुती केलेली असून अमेरिकेतल्या सदाचारी लोकांनी गुलामास दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरपेक्षता व परोपकारी बुध्दी दाखवली यास्तव त्यांच्या सन्मानार्थ महात्मा फुले यांनी आपला हा ग्रंथ अर्पण केला आहे. आपले देशबांधव हे उदाहरण डोळयासमोर ठेवून आपल्या समाजातील शूद्रबांधवांची ब्राम्हण लोकांच्या गुलामगिरीतून मुक्तता करतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.[8]

*शेतक—यांचा आसूड :–*

जोतिरावांनी 'शेतक—यांचा आसूड' हा ग्रंथ इ.स.1883 मध्ये लिहून हातावेगळा केला. शेतक—यांच्या अगतिकेचे मूळ जोतिरावांच्या मनानुसार त्याच्या अज्ञानात, अशिक्षितपणात होते. ही गोष्ट त्यांनी आपल्या इतर ग्रंथातूनही वारंवार सांगितली आहे. हया ग्रंथाच्या उपोद्घानाच्या प्रारंभी तर त्यांनी

'विद्येविना मति गेली ! मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली ! गती विना वित गेले
वित्ताविना शूद्र खचले ! इतके अनर्थ एका अविद्येने केले!!

असे म्हटले आहे सामाजिक जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रामधून होणा–या आर्थिक शोषणाकडे या ग्रंथाच्या द्वारे जोतिरावांनी सर्वाचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या या आसूडाचे फटके प्रस्थापिताच्या हस्तकांच्या वर्मी लागावेत असे आहेत. शेतक–यांनीही अज्ञान, आळस, धर्मभोळेपणा, सुखासीनता, व्यसनासक्ती इत्यादी आपले दोष काढून टाकले पाहिजेत आणि डोळे उघडे ठेवून आपल्या हितसंबंधाची जपणूक केली पाहिजे याचीही जोतिरावांनी त्यांना जाणिव करुन दिली आहे.[9]

*सत्सार :–*

जोतिरावांनी इ.स.1885 मध्ये 'सत्सार' हे नियतकालिक सुरु केले. या अकांत इंग्रज सरकारच्या प्रयत्नाने अज्ञानी शूद्रादी अतिशूद्रास थोडेफार लिहिता वाचता येत असल्याचे जोतिरावांनी म्हटले आहे. यात हजारो वर्षापासून शूद्रादी अतिशूद्रांची सर्व बाजूंनी पिळवणूक सनातनी भटभिक्षूक कशी करतात हे दाखविले आहे. आपल्या प्रयत्नास आमचे निःपक्षपाती विचारशील महमंदी, खिस्ती व हिंदू बांधवांनी उदार आश्रय दिल्यास यापुढचे अंक दर आठवडयाला प्रकाशीत केले जातील असे जोतिरावांनी प्रस्तावनेत म्हटले आहे. एका आठवडयात त्याच्या 1050 प्रति खपल्या तेव्हा त्यांनी दुसरा अंक प्रसिध्द केला. पहिल्या अंकात त्यांनी ब्राम्हो समाज व प्रार्थना समाज यांची भूमिका भिन्न जातीतील स्त्री पुरुषांच्या संबंधातून जन्मलेल्या संततीचे सामाजिक स्थान आणि आर्यभटांची धर्मकल्पना या तीन प्रश्नांची चर्चा केली आहे.[10]

सत्सारच्या दुस–या अंकामध्ये स्त्रियांच्या छळाविषयीची चर्चा केलेली आहे. तसेच स्त्रियांना जागृत करण्यासाठी पंडीता रमाबाईंनी जे प्रयत्न केले प्रशंसा करुन स्त्री शिक्षणाचे महत्व समजावून सांगितले आहे.

*इशारा :–*

जोतिरावांनी 'इशारा' हे पुस्तक 1885 मध्ये लिहिले आहे. न्यायमूर्ती रानडे यांनी पुण्यामध्ये मे 1885 मध्ये 'शेतीची स्थिती' या विषयावर व्याख्यान दिले. त्यांत त्यांनी '30 वर्षापेक्षा हल्ली शेतकीची स्थिती चांगली आहे.' 'शेतक–यांचे धान्य बाजारात सुलभरितीने जाते व दुस–या अनेक सुधारणा झाल्या आहेत असे मत मांडले होते. जोतिरावांना रानडयांचे हे प्रतिपादन मूळीच रुचले नाही. 'इशारा' पुस्तिकेत त्यांनी रानडे यांच्या मतावर कडाडून टीका केली अशा प्रकारे रानडयांच्या व्याख्यानातील त्यांच्या मतांचे खंडन जोतिरावांनी अत्यंत बुध्दीकौशल्याने व वास्तववादाने या पुस्तिकेत केलेले आहे.[11]

*सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजा–विधी :–*

जोतिरावांनी इ.स.1887 सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजा–विधी सांगणारी पुस्तिका प्रकाशित केली. भोळया–भाबडया बहुजन समाजाला त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेवून रुढी परंपरेच्या नावाखाली आणि खोटया धर्माच्या नावाखाली निरनिराळया संस्काराचे वेळी लुटणा–या भट–भिक्षुकाबद्दल त्यांना चीड होती. म्हणूनच अनेकविध शास्त्रविहित संस्काराचा आणि पुजाविधीतील अर्थशून्य व दिखाऊ उपचारांचा फाफटपसा–यास फाटा देऊन बहुजन समाजाला मानवेल व रुचेल अशा सोप्या व मोजक्या धर्मकृत्यांचे विधी व त्यांनी एका स्वतंत्र पुस्तिकेत लिहून ते पुस्तक समाजाच्या सर्व सभासदांना प्रत्येकी 1 आण्यास विकले. हे पुस्तक नारायण लोखंडे यांनी आपल्या दीनबंधू छापखान्यात प्रसिध्द केले. या पुस्तिकेत विवाह, वास्तूशांती आणि दशपिंड यांचा आंतर्भाव आहे या पुस्तिकेतील भाषा अत्यंत सोपी सुटसुटीत आणि सर्वसामान्य माणसांस कळण्यासारखी आहे.[12]

*सार्वजनिक सत्यधर्म :–*

'सार्वजनिक सत्यधर्म' हा जोतिरावांचा शेवटचा ग्रंथ त्यांच्या मृत्युनंतर 1891 मध्ये प्रसिध्द झाला. जोतिरावांच्या विश्वबंधूत्व व विश्वकुटुंब वादाचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहिरनामा आहे. जोतिरावांनी हा ग्रंथ अर्धांगाचा झटका आल्यानंतर उजवा हात लुळा झाल्यावर शरीरातील व्यथा सहन करीत डाव्या हाताने लिहून पूर्ण केला.'सार्वजनिक सत्यधर्म' मध्ये जोतिरावांचे मानवतेच्या महान विचारांचे व महात्मतेचे तेजोवलय पूर्ण प्रकट झाले आहे. हा ग्रंथ म्हणजे मानवी जीवन मूल्यांचा व मानवी स्वातंत्र्याचा एक जाहीरनामा आहे. महात्मा फुले यांनी हा ग्रंथ मानवतेच्या महान तत्वज्ञान मंदिरावर विधायक व कल्याणदायक कळस चढविला. मानवी जीवनाला सर्व अर्थाने गुलामगिरीच्या बेडीत बंदिस्त करणा–या प्रत्येक सामाजिक व धार्मिक संस्थेवर त्यांनी टीका केली. मानवाला बंदिस्त करणा–या मतलबी धर्माच्या जागी सत्यावर आधारलेल्या व सर्व मानवांना समान न्याय देणा–या ख–या प्रतिष्ठापना 'सार्वजनिक सत्यधर्माच्या' माध्यमातून जोतिरावांनी केली. जोतिरावांच्या या सत्यधर्मात पुजा, जप–जाप्य, कर्मकांड, जातीभेद, स्त्री–पुरुष भेद या कशालाच त्यात थारा नाही.

चोरी, व्यभिचार, व्यसनाधिनता, पिढीजात श्रेष्ठत्व, कपट, अन्याय, देवभोळेपणा, अक्षरशून्यता इत्यादी दुर्गुणांना बाजूला सारुन स्वच्छता, सचोटी, गृहकृत्य दक्षता, सदाचरण, सततोद्योग, भूतदया, व्यक्तीस्वातंत्र्य, ज्ञान, साक्षरता, श्रमप्रतिष्ठा, सहिष्णुता, सर्वधर्मसमभाव, बंधुता, मानवता, समता वगैरे सद्गुणांची जोपासना करणे हेच सत्यधर्माचे मुख्य उद्दिष्ट जोतिरावांनी सांगितले आहे.[13]

*अखंडादि काव्यरचना :–*

जोतिरावांनी अनेक गद्यग्रंथ लिहिले आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या हातून बरचेस पद्यवाङःमय ही लिहिले आहे त्यांचे बहुतांश लेखन स्फूट स्वरुपाचे आणि मराठी साहित्यातील अभंग वाङःमयाचा धर्तीची आहे. जोतिरावांनी पद्यकाव्यांची रचना केली आणि त्यास अखंड असे नाव दिले. त्यामध्ये त्यांनी विविध विषयांचा अंतर्भाव केला. गणपती, भटाची वाणी, ब्राम्हणांचा भोंदूपणा यांसारख्या विषयांच्याद्वारा त्यांनी आपल्या नेहमीच्या धारदारपध्दतीने हिन्दू धर्मावर टीकास्त्र सोडले आहे. बळीराजा, मानव महमंद या थोर महात्म्यांची महती वर्णन करण्यासाठी त्यांनी अखंडाची रचना केली आहे. काही पद्यरचना म्हणजे तर सयाजीराव गायकवाड, गंगाराम भाऊ मस्के यांच्यासारख्या प्रसिध्द व्यक्तींना लिहिली पत्रेच आहेत.[14] या अखंडातून त्यांनी समतेचा व मानवाच्या कल्याणाचा सद्विचार मांडला. समता, मानवता, सदाचार, विवके, न्यायप्रियता, सहिष्णूता व नीतीचा विचार प्रखरपणे या अखंडातून त्यांनी समाजातील वाईट चालीरितींवर, अंधश्रध्देवर, अन्यायी जातीव्यवस्थेवर कठोरपणे प्रहार केलेले आहेत. जोतिरावांचे अखंडात प्रचंड सामाजिक आशय असून या काव्याच्या ओळी–ओळीत सामाजिक जाणिव व्यक्त होत आहेत. जोतिरावांनी जी अखंडादि काव्यरचना केली ती प्रयत्नपूर्वक सरळ सोपी व बहुजन समाजाला सहज समजेल अशी केली आहे.[15]

*संदर्भ ग्रंथसूची :–*

1.सरदार गं.बा. महात्मा फुले–पुणे 1944 पृष्ठ कमांक 76
2.कित्ता पृष्ठ कमांक 77
3.गुंदेकर श्रीराम डॉ. महात्मा फुले विचार आणि वाङःमय भाग 1 व 2 अरुण पारगावकर, पुणे, 15 ऑगस्ट 1992 पृष्ठ 273
4.फडके य.दि.(संपा) म.फुले समग्र वाङःमय चौथी आवृत्ती – 1998 पृष्ठ 77
5.कित्ता पृष्ठ 80
6.कांडगे ॲड. राम, 'महा–महात्मा जोतिराव फुले व्यक्ती व कार्य' राजश्री प्रकाशन चाकण पुणे, मार्च 2004 पृष्ठ कमांक 100
7.सरदार गं.बा. महात्मा फुले पुणे – 1944 पृष्ठ कमांक 83
8.कित्ता पृष्ठ कमांक 84
9.कित्ता पृष्ठ कमांक 87
10.कित्ता पृष्ठ कमांक 87
11.कांडगे ॲड. राम, 'महा–महात्मा जोतिराव फुले व्यक्ती व कार्य' राजश्री प्रकाशन चाकण पुणे, मार्च 2004 पृष्ठ कमांक 230,236
12.कित्ता कांडगे ॲड. राम, 'महा–महात्मा जोतिराव फुले व्यक्ती व कार्य' राजश्री प्रकाशन चाकण पुणे, मार्च 2004 पृष्ठ कमांक 186
13.कित्ता कांडगे ॲड. राम, 'महा–महात्मा जोतिराव फुले व्यक्ती व कार्य' राजश्री प्रकाशन चाकण पुणे, मार्च 2004पृष्ठ कमांक 286,287,305,306
14.सरदार गं.बा. महात्मा जोतिराव फुले – पुणे 1944 पृष्ठ 92
15.कांडगे ॲड. राम, 'महा–महात्मा जोतिराव फुले व्यक्ती व कार्य' राजश्री प्रकाशन चाकण पुणे, मार्च 2004 पृष्ठ कमांक 145

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net